श्रीमद् भागवत का यह सार
भगवद् भक्ति ही आधार

श्रीमद्भागवत रसिक कुटुंब

उद्धव गीता (11.9)



स्व धाम प्रस्थान को देखो हो रहे श्री कृष्ण तैयार।
उद्धृत किए उद्धव समक्ष अद्भुत अनमोल उद्गार ।।

नारायणं(न्) नमस्कृत्य, नरं(ञ्) चैव नरोत्तमम्।
देवीं(म्) सरस्वतीं(वँ) व्यासं(न्), ततो जयमुदीरयेत्

नामसङ्कीर्तनं(यँ) यस्य, सर्वपापप्रणाशनम्।
प्रणामो दुःखशमनस्, तं(न्) नमामि हरिं(म्) परम्

श्रीमद्भागवतमहापुराणम्
एकादशः स्कंधः
अथनवमोऽध्यायः

ब्राह्मण उवाच

परिग्रहो हि दुःखाय, यद् यत्प्रियतमं(न्) नृणाम् ।
अनन्तं(म्) सुखमाप्नोति, तद् विद्वान् यस्त्वकिं(ञ्)चनः ॥ 1॥

अवधूत म्हणाले – माणसांना जी वस्तू आवडते, तिचा साठा करणे त्याच्या दुःखाला कारणीभूत ठरते. हे ओळखून जो साठवण करत नाही, तो अपार आनंदाचा अनुभव घेतो.

सामिषं(ङ्) कुररं(ञ्) जघ्नुर्- बलिनो ये निरामिषाः ।
तदामिषं(म्) परित्यज्य, स सुखं(म्) समविन्दत ॥ 2॥

मांसाचा तुकडा चोचीत धरलेल्या कुररपक्ष्यावर स्वतःजवळ मांस नसलेले दुसरे पक्षी तुटून पडले. त्याने मांसाचा तुकडा फेकून दिला, तेव्हा तो सुखी झाला. (संग्रह करणे, हे संकटाचे मूळ आहे, ही शिकवण कुरराकडून घ्यावी.)

न मे मानावमानौ स्तो, न चिन्ता गेहपुत्रिणाम् ।

आत्मक्रीड आत्मरतिर्- विचरामीह बालवत् ॥ 3॥

द्वावेव चिन्तया मुक्तौ, परमानन्द आप्लुतौ ।

यो विमुग्धो जडो बालो, यो गुणेभ्यः(फ्) परं(ङ्) गतः ॥ 4॥

ज्याप्रमाणे बालक स्वतःशीच रममाण होते, त्याला कोणतीही काळजी नसते, त्याचप्रमाणे मीसुद्धा आत्मानंदात मग्न असतो. मान मिळो की अपमान होवो, माझ्यावरत्याचा परिणाम होत नाही. घर-परिवार यांचीही मला काळजी नाही. जगात फक्त दोनच व्यक्ती चिंतामुक्त आहेत. एक म्हणजे अजाण व काही काम न करणारे बालक किंवा गुणातीत. हे दोघेही परम आनंदात मग्न असतात. (मानपान इत्यादींची चिंता न करणे, हा गुण बालकांकडून घ्यावा.)

क्वचित् कुमारी त्वात्मानं(वँ), वृणानान् गृहमागतान् ।

स्वयं(न्) तानर्हयामास, क्वापि यातेषु बन्धुषु ॥ 5॥

एके दिवशी कुण्या कुमारिकेच्या घरी तिला मागणी घालण्यासाठी म्हणून काही लोक आले होते. त्या दिवशी तिच्या घरातील लोक कोठेतरी बाहेर गेले होते. म्हणून तिने स्वतःच त्यांचे आदरातिथ्य करण्याचे ठरविले.

तेषामभ्यवहारार्थं(म्), शालीन् रहसि पार्थिव ।

अवघ्नन्त्याः(फ्) प्रकोष्ठस्थाश्- चक्रुः(श्) शं(ङ्)खाः(स्) स्वनं(म्) महत् ॥ 6॥

राजन् ! त्यांच्यासाठी स्वयंपाक करावा या हेतूने ती घरातील एका कोपऱ्यात भात कांडू लागली. त्यावेळी तिच्या मनगटातील बांगड्या मोठ्याने वाजू लागल्या. या आवाजावरून घरात धान्य नाही, हे पाहुण्यांना कळेल, हे लक्षात घेऊन तिला अतिशय लाज वाटली आणि तिने एक एक करून सगळ्या बांगड्या फोडून टाकल्या. शेवटी दोन्ही हातांमध्ये दोन बांगड्या राहू दिल्या.

सा तज्जुगुप्सितं(म्) मत्वा, महती व्रीडिता ततः ।

बभं(ञ्)जैकैकशः(श्) शं(ङ्)खान्, द्वौ द्वौ पाण्योरशेषयत् ॥ 7॥

ती पुन्हा भात कांडू लागली. परंतु त्या दोन दोन बांगड्याही जेव्हा आवाज करू लागल्या, तेव्हा तिने आणखी एक एक बांगडी फोडून टाकली. दोन्ही मनगटांमध्ये जेव्हा एक एक बांगडी शिल्लक राहिली, तेव्हा आवाज बंद झाला.

उभयोरप्यभूद् घोषो , ह्यवघ्नन्त्याः(स्) स्म शं(ङ्)खयोः ।

तत्राप्येकं(न्) निरभिद- देकस्मान्नाभवद् ध्वनिः ॥ 8॥

हे शत्रूचे दमन करणाऱ्या ! त्या वेळी लोकव्यवहार जाणण्याच्या इच्छेने मीसुद्धा तेथे जाऊन पोहोचलो. मी त्या प्रसंगातून हे शिकलो की, जेव्हा पुष्कळ लोक एकत्र राहतात तेव्हा त्यांच्यामध्ये कलह होतो आणि जेव्हा दोघेजण राहतात तेव्हा सुद्धा गप्पागोष्टी होतात. म्हणून साधकाने कुमारिकेच्या बांगडीप्रमाणे एकट्यानेच राहिले पाहिजे. (या प्रसंगातून 'मुनीने एकट्याने राहावे', हे कळते.)

अन्वशिक्षमिमं(न्) तस्या, उपदेशमरिन्दम ।

लोकाननुचरन्नेताँ(लँ)ल् - लोकतत्त्वविवित्सया ॥ 9॥

आसन आणि श्वास यांच्यावर विजय मिळवून वैराग्य व अभ्यासाने आपले मन ताब्यात आणावे. त्यानंतर सावधपणे ते एका लक्ष्यावर लावावे.

वासे बहूनां(ङ्) कलहो, भवेद् वार्ता द्वयोरपि ।

एक एव चरेत्तस्मात्, कुमार्या इव कं(ङ्)कणः ॥ 10॥

जेव्हा परमात्म्यामध्ये मन स्थिर होते, तेव्हा ते हळूहळू कर्मवासनांची धूळ झटकून टाकते. होता होता सत्त्वगुण वाढून रज-तम नाहीसे होतात. अखेर जसे इंधन नसलेला अग्नी शांत होतो, त्याप्रमाणे मन शांत होते.

मन एकत्र सं(यँ)युज्याज्-जितश्वासो जितासनः ।

वैराग्याभ्यासयोगेन, ध्रियमाणमतन्द्रितः ॥ 11॥

अशा प्रकारे जेव्हा चित्त आपल्या आत्म्यामध्येच स्थिर होते, तेव्हा त्याला आत-बाहेर अशा कोणत्याही पदार्थाचे भान राहत नाही. मी असे पाहिले होते की, बाण तयार करणारा एक कारागीर बाण तयार करण्यात इतका मग्न झाला होता की, त्याच्या जवळूनच सैन्यासह राजाची स्वारी निघून गेली, तरी त्याला तिचा पत्ता लागत नाही.(बाणकर्त्याकडून 'एकाग्रता' हा गुण घ्यावा.)

यस्मिन् मनो लब्धपदं(यँ) यदेतच्-

छनैः(श्) शनैर्मुं(ञ्)चति कर्मरेणून् ।

सत्त्वेन वृद्धेन रजस्तमश्च,

विधूय निर्वाणमुपैत्यनिन्धनम् ॥ 12॥

मुनीने एकट्येच राहावे. राहण्याच्या ठिकाणाविषयी ममता नसावी. सावध असावे. एकांतात किंवा गुहेत राहावे. बाहेर वेषावरून स्वतःला कोणासमोर प्रगट करू नये आणि कमी बोलावे.

तदैवमात्मन्यवरुद्धचित्तो,

न वेद किं(ञ्)चिद् बहिरन्तरं(वँ) वा ।

यथेषुकारो नृपतिं(वँ) व्रजन्त-

मिषौ गतात्मा न ददर्श पार्श्वे ॥ 13॥

या अनित्य शरीरासाठी अपार कष्ट करून घर बांधणे निरर्थक आहे. उंदराने तयार केलेल्या बिळामध्ये साप आरामात राहतो. (सापाच्या उदाहरणाने साधकाने घर वगैरे बांधू नये, हा धडा घ्यावा.)

एकचार्यनिकेतः(स्) स्या- दप्रमत्तो गुहाशयः ।

अलक्ष्यमाण आचारैर्- मुनिरेकोऽल्पभाषणः ॥ 14॥

गृहारम्भोऽतिदुःखाय, विफलश्चाध्रुवात्मनः ।

सर्पः(फ्) परकृतं(वँ) वेश्म, प्रविश्य सुखमेधते ॥ 15॥

एको नारायणो देवः(फ्), पूर्वसृष्टं(म्) स्वमायया ।

सं(म्)हृत्य कालकलया, कल्पान्त इदमीश्वरः ।।16।।

एक एवाद्वितीयोऽभू- दात्माधारोऽखिलाश्रयः ।

कालेनात्मानुभावेन, साम्यं(न्) नीतासु शक्तिषु ।

सत्त्वादिष्वादिपुरुषः(फ्), प्रधानपुरुषेश्वरः ॥ 17॥

परावराणां(म्) परम, आस्ते कैवल्यसं(ञ्)ज्ञितः ।

केवलानुभवानन्द- सन्दोहो निरुपाधिकः ॥ 18॥

आपल्या मायेनें एका नारायण देवांनीच निर्माण केलेले हे विश्व कल्पाच्या शेवटी आपल्या काळशक्तीद्वारे स्वतःमध्येच विलीन करून, सर्वांना आपल्यात घेऊन स्वतःच्याच आधारावर ते एकमेवाद्वितीय होऊन राहिले. प्रकृती आणि पुरुष या दोहोंचे नियामक असलेले तेच आदिपुरुष जेव्हा आपल्या काळशक्तीच्या सामर्थ्याने या सत्त्वादी शक्तींना साम्यावस्थेत घेऊन जातात, तेव्हा सर्व कार्य-कारणांचे परम कारण असे ते एकटेच असतात. ते केवळ अनुभवस्वरूप व आनंदाचा पुंज आहेत. तेथे प्रकृतीची कोणतीही उपाधी नाही.

केवलात्मानुभावेन, स्वमायां(न्) त्रिगुणात्मिकाम् ।

सं(ङ्)क्षोभयन् सृजत्यादौ, तया सूत्रमरिन्दम ॥ 19॥

केवळ आपल्या सामर्थ्यानेच ते आपल्या त्रिगुणात्मक मायेमध्ये क्षोभ उत्पन्न करतात. हे शत्रुसूदना! त्या मायेद्वारे ते सर्वप्रथम सूक्ष्माची-क्रियाशक्तिप्रधान महत्तत्त्वाची निर्मिती करतात.

तामाहुस्त्रिगुणव्यक्तिं(म्), सृजन्तीं(वँ) विश्वतोमुखम् ।

यस्मिन् प्रोतमिदं(वँ) विश्वं(यँ), येन सं(म्)सरते पुमान् ॥ 20॥

ते सूक्ष्म तीन गुणांचे कार्य आहे. तेच साऱ्या विश्वाची अहंकारद्वारा निर्मिती करते. त्यामध्ये हे सगळे विश्व आत-बाहेर व्यापलेले आहे. त्याच्यामुळेच मनुष्य जन्म-मृत्यू-चक्रात फिरत राहतो.

यथोर्णनाभिर्हृदया- दूर्णां(म्) सन्तत्य वक्त्रतः ।

तया विहृत्य भूयस्तां(ङ्), ग्रसत्येवं(म्) महेश्वरः ॥ 21॥

ज्याप्रमाणे कोळी-कीटक आपल्या हृदयातून तोंडच्याद्वारे तंतू बाहेर काढून जाळे पसरतो, त्यातच विहार करतो आणि पुन्हा ते गिळून टाकतो, त्याप्रमाणे परमेश्वरसुद्धा आपल्यापासूनच या जगाची उत्पत्ती करतात, जीवरूपाने त्यामध्ये विहार करतात आणि पुन्हा ते आपल्यातच लीन करून घेतात.(विश्व आणि ब्रह्म एकरूप आहे, हे कोळ्याच्या जाळ्याच्या दृष्टान्ताने स्पष्ट केले आहे.)

यत्र यत्र मनो देही, धारयेत् सकलं(न्) धिया ।

स्नेहाद् द्वेषाद् भयाद् वापि, याति तत्तत्सरूपताम् ॥ 22॥

जर एखादा स्नेहाने, द्वेषाने किंवा भीतीनेसुद्धा बुद्धिपूर्वक आपले मन एखाद्या ठिकाणी केंद्रित करील, तर त्याला त्या वस्तूचे स्वरूप प्राप्त होते.

कीटः(फ्) पेशस्कृतं(न्) ध्यायन्, कुड्यां(न्) तेन प्रवेशितः ।

याति तत्सात्मतां(म्) राजन्, पूर्वरूपमसन्त्यजन् ॥ 23॥

कुंभारमाशी एखादा किड्याला पकडून आणून त्याला भिंतीवरील मातीच्या घरात बंदिस्त करून टाकते. बाहेरून वारंवार येऊन त्याला भू-भू करून घाबरविते. तिच्या भीतीने तिचेच चिंतन करीत करीत तो आपल्या पहिल्या शरीराचा त्याग न करताही तिच्यासारखाच होतो. (याप्रमाणे कोणत्याही प्रकारे का होईना, परमात्म्याचे सतत चिंतन केल्याने मनुष्यसुद्धा परमात्म्याला प्राप्त करतो, हे ज्ञान किड्यापासून घ्यावे.)

एवं(ङ्) गुरुभ्य एतेभ्य, एषा मे शिक्षिता मतिः ।

स्वात्मोपशिक्षितां(म्) बुद्धिं(म्), शृणु मे वदतः(फ्) प्रभो ॥ 24॥

राजन्! अशा प्रकारे मी इतक्या गुरूंकडून हे ज्ञान घेतले. आता, मी आपल्या शरीराकडून जे शिकलो, ते तुला सांगतो. नीट ऐक.

देहो गुरुर्मम विरक्तिविवेकहेतुर्-

बिभ्रत् स्म सत्त्वनिधनं(म्) सततार्त्युदर्कम् ।

तत्त्वान्यनेन विमृशामि यथा तथापि,

पारक्यमित्यवसितो विचराम्यसं(ङ्)गः ॥ 25॥

माझा हा देहसुद्धा माझा गुरूच आहे. हा मला वैराग्य आणि विवेकाचा उपदेश करतो. याला जन्म व मरण असल्यामुळे याच्या पाठीशी दुःख सततचे लागलेलेच आहे. या देहामुळे मी तत्त्वचिंतन करत असलो तरी हा देह हिंस्र प्राणी, अग्नी इत्यादी दुसऱ्यांचाच आहे, असा निश्चय करून या देहाची आसक्ती सोडून मी वागत असतो.

जायात्मजार्थपशुभृत्यगृहाप्तवर्गान्,

पुष्णाति यत्प्रियचिकीर्षुतया वितन्वन् ।

स्वान्ते सकृच्छ्रमवरुद्धधनः(स्) स देहः(स्),

सृष्ट्वास्य बीजमवसीदति वृक्षधर्मा ॥ 26॥

जो मनुष्य पत्नी, पुत्र, धन-दौलत, पशू, सेवक, घर, आप्तेष्ट यांची वाढ करीत त्यांच्याकडून ज्या देहाला सुख मिळेल, अशी इच्छा बाळगून त्यांचे पालन-पोषण करतो आणि अतिशय कष्ट करून धनसंचय करतो, तोच देह शेवटी, बी निर्माण करून झाडाने नष्ट व्हावे, त्याप्रमाणे आपल्या पुढच्या जन्मासाठी कर्मरूप बीज तयार करून मृत्यूला कवटाळतो.

जिह्वैकतोऽमुमपकर्षति कर्हि तर्षा,

शिश्नोऽन्यतस्त्वगुदरं(म्) श्रवणं(ङ्) कुतश्चित् ।

घ्राणोऽन्यतश्चपलदृक् क्व च कर्मशक्तिर्-

बह्व्यः(स्) सपत्न्य इव गेहपतिं(लँ) लुनन्ति ॥ 27॥

जसे एखाद्या माणसाला त्याच्या पुष्कळशा सवती पत्न्या आपापल्याकडे ओढून त्याला सतावतात, त्याचप्रमाणे देहाभिमानी जीवाला एकीकडे त्याची रसना खाद्यपदार्थांकडे ओढते तर कधी तहान सतावते, कधी एकीकडे जननेंद्रिय व्याकूळ करते, तर दुसरीकडे त्वचा, पोट, कान हे आपापल्या विषयांकडे खेचून घेतात. नाक कधी सुगंधाकडे ओढते, तर कधी चंचल डोळे रूप पाहण्यासाठी आकर्षित करतात. कधी कर्मेंद्रिये आपापल्या विषयांकडे ओढतात.

सृष्ट्वा पुराणि विविधान्यजयाऽऽत्मशक्त्या,

वृक्षान् सरीसृपपशून् खगदं(म्)शमत्स्यान् ।

तैस्तैरतुष्टहृदयः(फ्) पुरुषं(वँ) विधाय,

ब्रह्मावलोकधिषणं(म्) मुदमाप देवः ॥ 28॥

भगवंतांनी आपल्या अचिंत्य शक्ती असलेल्या मायेद्वारे झाडे, सरपटणारे प्राणी, पशू, पक्षी, डास, मासे अशा अनेक प्रकारच्या योनी निर्माण केल्या, परंतु त्यांपासून त्यांचे समाधान झाले नाही. तेव्हा त्यांनी मनुष्यशरीराची निर्मिती केली. ब्रह्माचा साक्षात्कार करून घेऊ शकणाऱ्या बुद्धीने युक्त अशा याची रचना केल्यावर त्यांना आनंद झाला.

लब्ध्वा सुदुर्लभमिदं(म्) बहुसम्भवान्ते,

मानुष्यमर्थदमनित्यमपीह धीरः ।

तूर्णं(यँ) यतेत न पतेदनुमृत्यु यावन्-

निःश्रेयसाय विषयः(ख्) खलु सर्वतः(स्) स्यात् ॥ 29॥

अत्यंत दुर्लभ असणारे हे मनुष्यशरीर पुष्कळ जन्मांनंतर मिळालेले आहे. याच्यामुळे परम पुरुषार्थाची प्राप्ती होऊ शकते. त्याचबरोबर हे नाशही पावणारे आहे, हे जाणून जोवर मृत्यूने त्याला आपल्या कवेत घेतले नाही, तोवर शहाण्याने तात्काळ आपल्या परम कल्याणासाठी प्रयत्न करावेत. कारण विषयभोग तर सर्वत्र मिळतात.

एवं(म्) सं(ञ्)जातवैराग्यो, विज्ञानालोक आत्मनि ।

विचरामि महीमेतां(म्), मुक्तसं(ङ्)गोऽनहं(ङ्)कृतिः ॥ 30॥

अशा प्रकारे मला वैराग्य प्राप्त झाले. अंतःकरणामध्ये विज्ञानाचा प्रकाश पसरला. त्यामुळे मी अहंकार व आसक्ती सोडून या पृथ्वीवर स्वच्छंदपणे वावरतो.

न ह्येकस्माद् गुरोर्ज्ञानं(म्), सुस्थिरं(म्) स्यात् सुपुष्कलम् ।

ब्रह्मैतदद्वितीयं(वँ) वै, गीयते बहुधर्षिभिः ॥ 31॥

म्हणून एकाच गुरूकडून पुष्कळ ज्ञान मिळाले, तरी ते उत्तम ठरत नाही. कारण एकाच अद्वितीय अशा ब्रह्माबद्दल ऋषींनी अनेक प्रकारे वर्णन केले आहे.

श्रीभगवानुवाच

इत्युक्त्वा स यदुं(वँ) विप्रस्- तमामन्त्र्य गभीरधीः ।

वन्दितोऽभ्यर्थितो राज्ञा , ययौ प्रीतो यथागतम् ॥ 32॥

अवधूतवचः(श्) श्रुत्वा, पूर्वेषां(न्) नः(स्) स पूर्वजः ।

सर्वसं(ङ्)गविनिर्मुक्तः(स्), समचित्तो बभूव ह ॥ 33॥

श्रीकृष्ण म्हणाले – धीर गंभीर अशा त्या अवधूत दत्तात्रेयांनी राजा यदूला असा उपदेश केला. यदूनेही त्यांना वंदन करून प्रार्थना केली. नंतर दत्तात्रेय प्रसन्नचित्ताने आपल्या इच्छेनुसार तेथून निघून गेले. आमच्या पूर्वजांचे सुद्धा पूर्वज असलेल्या यदूंनी अवधूतांचे हे म्हणणे ऐकून सर्व आसक्तीपासून आपली सुटका करून घेतली आणि ते समदर्शी झाले.

इति श्रीमद्भागवते महापुराणे पारमहं(म्)स्यां(म्)

सं(म्)हितायामेकादशस्कन्धे नवमोऽध्यायः ॥

ॐ पूर्णमदः(फ्) पूर्णमिदं(म्)पूर्णात्पूर्णमुदच्यते

पूर्णस्य पूर्णमादाय पूर्णमेवावशिष्यते ॥

ॐ शान्तिः(श्)शान्तिः(श्)शान्तिः ॥